## Criterion 7 – Institutional Values and Best Practices

**7.1.1 Measures initiated by the institution for the promotion of gender equity during year 2023-24**

**Annual gender sensitization action plan**
**Academic Year 2023-24**

| Sr. No. | Actions | Date of program |
|---|---|---|
| 1. | Organize Voter Awareness Program | 14-07-2023 |
| 2. | Organize International Youth Day | 12-08-2023 |
| 3. | Organize Tree Plantation Campaign | 18-09-2023 |
| 4. | Organize Mehendi Competition | 22-09-2023 |
| 5. | Organize Medical Checkup Camp | 27-09-2023 |
| 6. | Competitive Exam Guidance | 15-01-2024 |
| 7. | Organize Speech on "Scope in Higher Education After Graduation" | 20-01-2024 |
| 8. | Organize "Agniveer Army Training Workshop" | 25-31 Jan. 2024 |
| 9. | Organize "Granth Pradarshan" | 30-31 Jan. 2024 |
| 10. | Organize Women Health Awareness Program | 01-03-2024 |
| 11. | To Celebrate International Women's Day | 08-03-2024 |
| 12. | Counseling to girl students | Yearly |

Sardar V.P Arts & Sci. College AINPUR Pin 425507 Dist-Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

**Implementation of Action Plan**

**For the promotion of gender equity college established the different committees.**

## 1. Voter Awareness Program:

Voting rights are important in democracy. On the occasion of voter awareness program in college, Principal Dr. J.B. Anjane guided the newly admitted students about voting and how it is important in democracy. They said, in the democratic process everyone has to follow their rights and duties while distributing voter registration forms to the students. Employees of Raver Tehsil Office were also present. The right to vote is one of the most important of all rights. But, for that it is necessary to register your name in the voter list said Raver Tehsildar Bandu Kapse to the students.

Mr. Hemant Baviskar conducted this program successfully.

दिव्य मराठी भुसावळ 15-07-2023

**लोकशाहीत मताधिकार महत्त्वाचा, मतदार यादीत नोंद करा : डॉ. अंजने**

प्रतिनिधी | ऐनपूर

ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात मतदार जनजागृतीनिमित्त प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने यांनी नव प्रवेशित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लोकशाहीत मतदानाला महत्त्व आहे. हा अधिकार मिळवायचा असेल तर वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येकाने मतदान यादीत नावनोंदणी करावी असे आवाहन केले.

प्राचार्य डॉ.जे.बी.अंजने म्हणाले की, लोकशाही प्रक्रियेत प्रत्येकाला हक्क आणि कर्तव्यांचे पालन करावे लागते. त्यासाठी जे-जे अधिकार मिळाले आहेत त्यात मताधिकार खूपच महत्वाचा आहे. पण, त्यासाठी मतदार यादीत आपल्या नावाची नोंदणी करणे आवश्यक आहे. यानंतर विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी अर्जांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला रावेरचे तहसीलदार बंडू कापसे व नायब तहसीलदार आर.डी.पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तहसीलचे कर्मचारी विक्रम राठोड, सुलेमान तडवी यांनीही मदत केली. सूत्रसंचालन हेमंत बाविस्कर यांनी केले.



विद्यार्थ्यांना मतदार नोंदणी अर्जांचे वाटप करताना प्राचार्य जे.बी.अंजने. रावेर तहसील कार्यालयातील कर्मचारी देखील उपस्थित होते.

**Program Dated: 14-07-2023**

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 2. International Youth Day:

By the National Service Scheme Unit of College International Youth Day was celebrated on August 12, 2023. The program was presided by Head of Chemistry Department and I.Q.A.C. Coordinator Dr.S.N.Vaishnav. Keynote speaker, NSS Program Officer Dr. D. B. Patil said, if Youth is wise a country will become wise, also opined that the development of an individual is through internal motivation while the development of a nation is through unity. In the presidential speech, Dr. S. N. Vaishnav explained the historical background of International Youth Day.

The program was coordinated by Women Program Officer Dr. Rekha Patil. Vote of thank by NSS Student representative Dipasha Gurav.

दैनिक लोकशाही

# ऐनपूर महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर ता. रावेर** प्रतिनिधी



येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे दि. १२ ऑगस्ट या दिवशी आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रसायन शास्त्र विभागप्रमुख तथा आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. एस. एन. वैष्णव हे होते. प्रमुख वक्ते म्हणून रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील यांनी मार्गदर्शन करतांना, युवा सुज्ञ असतील तर देश सुज्ञ होईल, तसेच व्यक्तीचा विकास आंतरिक प्रेरणेने होतो तर राष्ट्राचा विकास एकात्मतेने होतो असे मत मांडले. अध्यक्षीय भाषणात डॉ. एस. एन. वैष्णव यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रेखा पाटील यांनी तर आभार रा. से. यो. विद्यार्थी प्रतिनिधी दिपाषा गुरव हिने मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रेखा पाटील, तसेच सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

Lokshahi Edition
Aug 15, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 12-08-2023**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 3. Tree Plantation:

NSS unit of college organized tree plantation program in college campus. By the auspicious hand of our institute chairman Hon. Shri. Shriram Narayan Patil some tree were planted. NSS program officer Dr. Dipak Patil, Dr. Rekha Patil and assistant program officer Dr. S. B. Patil successfully conducted this program.






दैनिक लोकशाही

# ऐनपूर महाविद्यालयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम

लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपूर ता रावेर प्रतिनिधी

येथील ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे चेअरमन मा.श्रीराम नारायण पाटील यांच्या हस्ते सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एककातर्फे आयोजीत या वृक्षारोपण कार्यक्रमास रासेयो. रावेर विभागीय समन्वयक डॉ. जे. पी. नेहेते, रासयो कार्यक्रम अधिकारी डॉ. डी. बी. पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रेखा पाटील तसेच डॉ. एस. ए. पाटील, क्रीडा संचालक प्रा. सचिन झोपे, प्रमोद पाटील, गोपाल महाजन, अनिकेत पाटील, श्रेयस पाटील तसेच रा. से. यो. स्वयंसेवक मोठया संखेने उपस्थित होते. या वृक्षारोपण कार्यक्रमात बेल, बकुळ, पिंपळ ई. वृक्षांची लागवड महाविद्यालय परिसरात करण्यात आली. या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जे बी अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

Lokshahi Edition
Sep 19, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

**Program Dated: 18-09-2023**

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 4. Mehendi Competition:

To encourage girl students for mehendi art and to search their hidden talent of mehendi art Yuvati Sabha committee organized Mehendi Competition on the occasion of Shree Ganesha festival. **Nine** girls participated in this competition. Dr. Rekha Patil and assistant teacher Miss Sushma Motekar were the examiner of the competition. Winner of this competition were as fallows

| Sr. No. | Name of Student | Prize |
|---|---|---|
| 1. | Miss Sima Pralhad Gavande | First Prize |
| 2. | Miss Komal Vinod Yevale | Second Prize |
| 3. | Miss Bhagyashri Bhagwat Mahajan<br>Miss Vaishnavi Nitin | Third Prize |

लोकशाही



# ऐनपूर महाविद्यालयात मेहंदी स्पर्धा

लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपूर ता रावेर प्रतिनिधी

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे युवतीसभेद्वारे गणेशोत्सव निमित्ताने विद्यार्थिनीसाठी मेहंदी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत ९ स्पर्धकांनी भाग घेतला होता. मुलींच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचा निकालात **(पान २ वर)**

Lokshahi Edition
Sep 23, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com

### ऐनपूर महाविद्यालयात...

गावंडे सीमा रवींद्र (प्रथम क्रमांक), येवले कोमल विनोद(द्वितीय क्रमांक) तर तृतीय क्रमांक(विभागून )-महाजन भाग्यश्री भागवत, पाटील वैष्णवी नितीन असे आले. मेहंदी स्पर्धेच्या परीक्षकाचे काम प्रा.डॉ.रेखा पाटील आणि प्रा. सुषमा मोतेकर यांनी केले. मेहंदी स्पर्धेचे आयोजन युवती सभा सचिव डॉ. नीता वाणी यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जे. बी. अंजने, डॉ नीता वाणी, प्रा डॉ. रेखा पाटील यांनी केले.

Page 2

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 22-09-2023**

Principal,
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 5. Medical Checkup Camp

A medical checkup camp for students was organized under Student Development. All the students of classes F.Y.B.A./B.Sc./M.A./M.Sc were medically examined. Dr.Sandeep Chaudhary from Vitwa, Dr. Abhijit Chaudhary, Dr. R. L. Patil from Ainpur, Dr.S.D.Patil, Dr.S.D.Chaudhary from Nimbhora assisted for medical examination. For this camp, the principal of the college Dr. J. B. Anjane guided. Also Student Development Officer Dr. V. N. Ramteke, Assistant Student Development Officer Dr. R. V. Bhole, Women Student Development Officer Dr. Neeta Wani successfully conducted this camp.

लोकशाही

थोडक्यात

**ऐनपुर महाविद्यालयात वैद्यकीय तपासणी शिबिर**



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपुर प्रतिनिधी**

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपुर येथे विद्यार्थी विकास विभागा अंतर्गत विद्यार्थ्यांचे वैद्यकीय तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये एफ. वाय बी. ए./ बी. एस्सी /एम. ए. /एम. एस्सी. च्या सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. वैद्यकीय तपासणी साठी विटवा येथील डॉ संदिप चौधरी, डॉ अभिजित चौधरी, ऐनपूर येथील डॉ आर एल पाटील, डॉ एस डी पाटील, निंभोंरा येथील डॉ एस डी चौधरी यांनी सहकार्य केले. या शिबिरासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .जे.बी. अंजने यांनी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. व्ही. एन. रामटेके, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. आर. व्ही. भोळे, महिला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. नीता वाणी तसेच डॉ. एस. एस. साळुंके प्रा. नरेंद्र मुळे, प्रा. प्रदीप तायडे, प्रा. ज्ञानेश्वर कोळी, प्रा. अक्षय महाजन, प्रा. एस. पी. उमरीवाड प्रा. व्ही.एच. पाटील प्राध्यापिका डॉ.आर.पी. पाटील तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी महेंद्र महाजन, अनिकेत महाजन, श्रेयस आणि भास्कर महाजन यांनी परिश्रम घेतले. शेवटी डॉ. संदीप चौधरी , डॉ. अभिजित चौधरी, डॉ एस डी पाटील, डॉ आर एल पाटील, डॉ एस डी चौधरी यांचे आभार मानून आजच्या शिबिराची सांगता करण्यात आली.

Lokshahi Edition
Sep 28, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 27-09-2023**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 6. Competitive Exam Guidance

College in association with Deepstambh Foundation, Jalgaon lectures were organized in college on topic- preparing competitive exams, MPSC, UPSC while pursuing college education.

The program was presided over by the principal Dr. J. B. Anjane. On the platform Prof. Ankush Mokate and Prof. Govinda Laxman Koli were present. Chief Guide Prof.Ankush Mokate, Deepstambh Foundation, Jalgaon, under its guidance, on behalf of the State and Central Governments, MPSC and UPSC information about various posts to be filled through these competitive examinations. After that, the students informed about the format of the competitive examination, the distribution of marks, the changes in format of question paper, age condition, prelims, mains and interview

In the question and answer session, various questions asked by the students were answered. 72 students actively attended this program.

दैनिक लोकशाही
epaper.lokshahilive.com
16 Jan 2024 - Page 6

### ऐनपूर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षेच्या तयारीवर मार्गदर्शन

लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपूर ता रावेर प्रतिनिधी



येथील ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळाच्या सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र आणि दीपस्तंभ फाउंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी "महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना एम.पी. एस.सी., यु.पी. एस.सी. आणि सरळसेवा भरती या स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी? " या विषयावर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या सुरवातीला लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेलांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने, डॉ.सतीश वैष्णव, प्रा.अंकुश मोकाटे आणि प्रा. गोविंदा लक्ष्मण कोळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. सतीश एन. वैष्णव (समन्वयक, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र) यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. अंकुश मोकाटे, दीपस्तंभ फाउंडेशन, जळगाव, यांनी आपल्या मार्गदर्शनात राज्य व केंद्र शासनातर्फे एम.पी. एस.सी. आणि यु.पी.एस.सी. या स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून भरल्या जाणाऱ्या विविध पदांची माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप, गुणांची विभागणी, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, वयाची अट, पूर्व, मुख्य परीक्षा आणि मुलाखत या बद्दल माहिती दिली. एम.पी. एस.सी. / यु.पी.एस.सी. स्पर्धा परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तक, संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्र, नियतकालिक यांचे वाचन आणि प्रश्नपत्रिकेतील प्रश्न सोडवण्याचा सराव असे सांगितले. प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनि विचारलेल्या विविध प्रश्नाची उत्तरे दिली. प्रा. गोविंदा लक्ष्मण कोळी यांनी विद्यार्थ्यांना सरळसेवा भरती प्रक्रिया आणि त्यासाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षांची माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांनाच स्पर्धा परीक्षांची तयारी करावी असे सांगितले.

(पान २ वर)

दैनिक लोकशाही
epaper.lokshahilive.com
16 Jan 2024 - Page 2

### ऐनपूर महाविद्यालयात स्पर्धा...

यासाठी महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सतत कार्यरत आहे असे सांगितले. सदर कार्यक्रमाला एकूण ७२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.जयंत पी. नेहेते यांनी तर आभार प्रा. प्रदीप तायडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.एच एम. बाविस्कर, प्रा. संजय बी. महाजन, प्रा. मिलिंद भोपे, डॉ. नरेंद्र मुळे, प्रा. अक्षय महाजन आणि सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**Program Dated: 15-01-2024**

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

## 7. Carrier Guidance: Scope in Higher Education After Graduation

College organized program on career guidance having topic "Scope in Higher Education after Graduation" on 20 Jan. 2024. Prof. Dipali Y. Kirange K.C.E.S's institute of management and research, Jalgaon guided students about different courses after graduation. In the second session Dr. Sandip Ghodake K.C.E.S's institute of management and research, Jalgaon guided about entrance exam in different fields after graduation. The programme was presided by Principal Dr. J.B. Anjane, IQAC coordinator Dr. S. N. Vaishanv successfully conducted program and vote of thanks by Dr. V. N. Ramteke. Total 56 students were actively participated in this program.

दैनिक **लोकशाही**

epaper.lokshahilive.com
23 Jan 2024 - Page 3

# ऐनपूर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपुर ता रावेर** प्रतिनिधी

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथील करिअर मार्गदर्शन केंद्राअंतर्गत उच्च शिक्षणातील वाटा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी भुषविले. तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.दिपाली वाय. किरंगे (के.सी. ई व्यवस्थापन व संशोधन संस्था जळगाव) यांनी पदवीनंतर उच्चं शिक्षणासाठी उपलब्ध असलेले विविध कोर्सेस की ज्यामध्ये आपल्याला मध्ये करिअर करता येते याबद्दल विस्तृत माहिती दिली.



तसेच या कार्यक्रमाचे दुसरे मार्गदर्शक डॉ. संदीप घोडके (के.सी.ई. व्यवस्थापन व संशोधन संस्था जळगाव) यांनी पदवीनंतर उच्चं शिक्षणासाठी उपलब्ध असलेले विविध कोर्से साठी घेण्यात येणाऱ्या पात्रता प्रवेश परीक्षा बद्दल माहिती देताना प्रवेश अर्ज कसा भरावा, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप समजावून सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ. एस. एन. वैष्णव यांनी केले. या कार्यक्रमाला तृतीय वर्ष कला व विज्ञान शाखेचे एकूण ५६ विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. अध्यक्षीय समारोपत प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी विद्यार्थ्यांना परंपरागत शिक्षणाचा मागे न धावता नवीन कोर्सेस निवडून आपले करिअर घडवता येईल असेल सांगितले. शेवटी करिअर मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. व्ही.एन.रामटेके यांनी मान्यवरांचे आभार मानले व शेवटी अध्यक्षांच्या परवानगीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**Program Dated: 20-01-2024**

Sardar V. P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 8. Agniveer Army Training Workshop

Student Development Department, Kavayitri Bahinabai Choudhary North Maharashtra University, Jalgaon and Student Development Department, of our College, conducted pre-training workshop from 25 to 30 January 2024. The main instructor of this workshop was Subedar Sandeep Kumar Jalgaon.

Chief Trainer Subhedar Sandeep Kumar gave information and training to the students for 2 hours.

Total of 40 students including 20 female and 20 male students were participated in training workshop.

दैनिक **लोकशाही**

epaper.lokshahilive.com
26 Jan 2024 - Page 5

### अग्नीवीर सैन्यदल पूर्व प्रशिक्षण कार्यशाळा सुरु

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपुर ता रावेर** प्रतिनिधी

सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे विद्यार्थी विकास विभाग कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व विद्यार्थी विकास विभाग सरदार वल्लभभाई पटेल कला विज्ञान महाविद्यालय ऐनपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५ जानेवारी रोजी अग्निवीर सैन्यदल पूर्व प्रशिक्षण कार्यशाळेला सुरुवात झाली. या कार्यशाळेचे मुख्य प्रशिक्षक सुभेदार संदीप कुमार जळगाव यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य



डॉ. जे. बी. अंजने यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापककेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीत बुके देऊन स्वागत केले. यावेळी मुख्य प्रशिक्षक सुभेदार संदीप कुमार यांनी २ तास विद्यार्थ्यांना माहिती सांगून प्रशिक्षण दिले. यावेळी महाविद्यालयातील २० विद्यार्थिनी व २० विद्यार्थी असे एकूण ४० विद्यार्थी उपस्थित होते.तसेच विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. व्ही.एन.रामटेके, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. आर. व्ही भोळे व महिला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. नीता वाणी उपस्थित होते.

**Workshop Dated: 25-30 Jan. 2024**

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

Principal,
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 9. Book Exhibition (Granth Pradarshan)

A two-day book exhibition successfully organized by the library on the occasion of Marathi language conservation. Inauguration of exhibition was done by institute Chairman Hon. Shri. Sriram Narayan Patil.

Head of Library Dr. S. S. Salunke gave the purpose and information about the reading culture of his first exhibition in the introduction. Along with this, he appealed to maximum number of students to take advantage of the initiative 'Bahinabai Chaudhary Abhyasika' implemented by the University for Competitive Examination.

Dr.M.K.Sonwane from Marathi department, gave information about Marathi language conservation fortnight and explained the importance of books and reading. On this occasion, the Board of Directors inspired the present students to read by examining the various books presented in the book exhibition on Marathi language. Principal Dr. J. B. Anjane suggested about reading reference materials on various subjects and other reading materials available in the college library.

Total 105 readers visited the book exhibition

दैनिक **लोकशाही**

epaper.lokshahilive.com
31 Jan 2024 - Page 5

# सरदार वल्लभभाई पटेल महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर ता रावेर** प्रतिनिधी



सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त ग्रंथालयातर्फे आयोजित दोन दिवसीय ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन यशस्वीरित्या झाले. उद्घाटन संस्थेचे मा. चेअरमन श्रीराम पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष मा. रामदास महाजन सहसचिव रामदास शिवराम महाजन, संचालक हरी भिका पाटील, संचालक कैलास कडू पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने , महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी ग्रंथालयाचे प्रमुख डॉ. एस. एस. साळंके यांनी आपल्या प्रास्ताविकेत ग्रथं प्रदर्शनाचा उद्देश्य तसेच वाचन संस्कृती याबद्दल माहिती दिली. याबरोबरच स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी विद्यापीठामार्फत राबवीत असलेल्या 'कवयित्री बहिणाबाई चौधरी अभ्यासिका' या उपक्रमाचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन केले. यानंतर मराठी विभागाचे डॉ. एम के सोनवणे यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा याबद्दल माहिती देऊन ग्रंथ व वाचनाचे महत्त्व विशद केले. याप्रसंगी संचालक मंडळ यांनी मराठी भाषेवरील ग्रंथ प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या विविध पुस्तकांचे परीक्षण करून उपस्थित विद्यार्थ्यांना वाचनाबद्दल प्रेरित केले. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांनी महाविद्यालयातील ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या विविध विषयांवरील संदर्भ साहित्य तसेच इतर वाचनीय साहित्याबद्दल माहिती देऊन शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात वाचनाला महत्त्व देऊन आपल्या सर्वांगीण विकास साधावा असे आवाहन केले. ग्रंथ प्रदर्शनास एकूण १०५ वाचकांनी भेट दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनात ग्रथंपाल डॉ. एस एस साळंके, आय. क्यू. ए. सी. समन्वयक तसेच उपप्राचार्य डॉ एस. एन. वैष्णव, डॉ. आर. व्ही. भोळे, डॉ. पी. आर. महाजन, डॉ. एस. एन. झोपे, डॉ. एस. ए. पाटील, प्रा. हेमंत बाविस्कर, डॉ. जयंत नेहेते, प्रा. एस. आर. इंगळे, डॉ. व्ही. एन. रामटेके, प्रा. एस. पी. उमरीवाड, प्रा. पी. एन. तायडे, प्रा. अक्षय महाजन, प्रा. नरेंद्र मुळे, प्रा. ज्ञानेश्वर कोळी, महेंद्र महाजन, हर्षल पाटील यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.


महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विकास
ग्रामपंचायत साळवा ता. धरणगांव जिल्हा जळगाव
ई-निविदा सूचना क्र. १ सन २०२३-२४ (प्रथम वेळ)
सरपंच / ग्रामसेवक ग्रामपंचायत साळवा ता. धरणगांव जिल्हा जळगाव
यांजकडून १५ वा वित्त आयोग योजने अंतर्गत जळगाव जिल्ह्यातील नोंदणीकृत पुरवठादार/कंत्राटदार यांच्या कडून Parcent Rate Tender दोन लिफाफा पद्धतीने पुढील कामाची ई - निविदा मागवीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| 1. | मौजे साळवा येथे जि.प शाळेत १००० लि./ता क्षमतेचे आर.ओ सयंत्र बसविणे | ५०००००/- |

ईच्छुक निविदाधारकांनि निविदेच्या अटी व शर्ती संदर्भात https://mahatenders.gov.in/nicgep/app या वेबसाईटवर तसेच ग्रामपंचायत कार्यालय येथे संपर्क साधावा.

/-
सरपंच/ ग्रामसेवक
साळवा ता. धरणगांव जिल्हा जळगाव


**Book Exhibition Dated: 30-31 Jan. 2024**

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

Principal,
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 10. Women Health Awareness Program

College implemented 'Atmanirbhar Yuvta Abhiyan' for the all-round development of female students through Kavayitri Bahinabai Chaudhary North Maharashtra University Jalgaon and Student Development Department of college. On the fifth day, Dr. Yogita Patil, Mauli Hospital Raver spoke on the topic of 'self-health'. Women who are the backbone of the family should take care of their own health. Also discussed on the relationship between diet and health, the need for a vitamin rich diet.

While interacting with the students, Dr. Yogita Patil guided, many women do not seek timely advice and treatment for health problems. This will increase the severity of the problem over time and lead to difficulties. Dr. Yogita advised to take healthy diet, yoga-pranayam, check-up and treatment from time to time to save money. Doubts of female students abrogated. Miss Mayuri Patil gave the vote of thanks. Student Development Officer Dr. V. N. Ramteke assisted. The program was conducted under the guidance of Principal Dr.J.B.Anjane.

दिव्य मराठी **भुसावळ 04-03-2024**

# महिला कुटुंबाचा कणा, आरोग्य जपा

### ऐनपूर येथील पटेल महाविद्यालयात डॉ.योगिता पाटील यांनी दिला सल्ला

**प्रतिनिधी** | ऐनपूर

ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि विद्यार्थी विकास विभागाच्या माध्यमातून विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी 'आत्मनिर्भर युवती अभियान' राबवण्यात येत आहे. त्यात पाचव्या दिवशी रावेर येथील माऊली हॉस्पिटलच्या डॉ.योगिता पाटील यांनी 'स्व-आरोग्य' या विषयावर संवाद साधला. कुटुंबाचा कणा असलेल्या महिलांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी. आहार आणि आरोग्याचा संबंध, जीवनसत्वयुक्त आहाराची आवश्यकता याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अनेक महिला आरोग्य विषयक समस्यांवर वेळीच सल्ला व उपचार घेत नाहीत. यामुळे कालांतराने समस्येची तीव्रता वाढून अडचणींना सामोरे जावे. आर्थिक हानी होते. त्यामुळे आरोग्य जपण्यासाठी सकस आहार, योग-प्राणायाम, वेळोवेळी तपासणी व उपचार घ्यावा, असा सल्ला दिला. विद्यार्थीनींच्या शंकांचे निरसन केले. अध्यक्षस्थानी डॉ.रेखा पाटील होत्या. प्रास्ताविक युवती सभा सचिव डॉ.नीता वाणी तर आभार मयुरी पाटील हिने मानले. विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. व्ही. एन. रामटेके, डॉ. आर. व्ही. भोळे, प्रा. संजना पाटील यांनी सहकार्य केले. प्राचार्य डॉ.जे.बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.



ऐनपूर येथे विद्यार्थिनींसोबत संवाद साधताना डॉ.योगिता पाटील.

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 01-03-2024**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver, Dist- Jalgaon

## 11. International Women's Day

College was celebrate the International Women's Day on 08 March 2024 with NSS and Students welfare Department of college. The function was inaugurated by Dr.Rekha Patil, Ladies NSS programme officer of our college was nicely explained the speech gender equity. The programme was anchored by Dr. Neeta Wani. Also she explained the history of Women's day. Vote of thanks by Rutika Gawali.



# ऐनपूर महाविद्यालयात जागतिक महिला दिन साजरा

▸▸ ऐनपूर, ता.रावेर । वार्ताहर

ऐनपूर परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथे युवती सभेतर्गत महिला दिन संपन्न झाला.

प्रस्तुत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. रेखा पाटील यांनी स्वीकारले प्रास्ताविक व सूत्रसंचालन युवती सभा सचिव डॉ.नीता वाणी यांनी केले. . विद्यार्थी विकास अधिकारी डॉ रामटेके यांनी आपल्या व्याख्यानात हिंदू कोडं बिलातील महिलांचे हक्क, अधिकार याबद्दल सविस्तर माहिती दिली त्याच प्रमाणे विद्यार्थीनींसमोर अनेक उल्लेखनिय कार्य केलेल्या महिलांचे आदर्श उभे केले.डॉ. नीता वाणी यांनी जागतिक महिला दिनाचा इतिहास सांगून आज भारतीय महिला सर्व क्षेत्रात अग्रेसर असल्यातरी तरीही अनेक महिलांना अनेक प्रकारचा अन्याय सहन करावा लागत आहे असे म्हटले कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रेखा पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्त्री वाद काय आहे त्यात काय अपेक्षित आहे याबद्दल माहिती दिली स्त्रियांना दिले जाणारे दुय्यम त्व यांनी स्वतः स्वीकारले आहे असे त्या म्हणाल्या ऋतिका गवळी हिने आभार मानले. डॉ. नरेंद्र मुळे, प्रा. अक्षय महाजन, प्रा. प्रदीप तायडे यांनी कार्यक्रमास .सहकार्य केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

**Program Dated: 08-03-2024**

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon

## 12. Counseling to girl students

Under the counseling cell of our college, Dr. Vinod Ramteke, Department of Psychology, guided 11 girl students on their problems about mental and physical health. The counseling cell nicely attain towards the problem of students about admission, career, health and hygiene etc. Dr. Ramteke told students about importance of meditation and follow it in their daily routine about 30 minutes.

दैनिक लोकशाही

epaper.lokshahilive.com
03 Apr 2024 - Page 3

### ऐनपुर महाविद्यालयात विद्यार्थ्यांना समुपदेशन

लोकशाही न्यूज नेटवर्क
ऐनपुर ता रावेर प्रतिनिधी

येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथील विद्यार्थ्यांना समुपदेशन करण्यात आले. सविस्तर असे की,सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालय ऐनपूर येथील विद्यार्थ्यांना समुपदेशन केंद्राचे समुपदेशक डॉ. व्ही. एन. रामटेके यांनी विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या समस्या सोडविण्यासाठी रोज ३० मिनिटे ध्यान साधना करण्याची आवश्यकता आहे. तसेच ३० मिनिटे पायी चालण्याचा सराव करावा



असे समुपदेशन केले. या केंद्रामध्ये ११ विद्यार्थिनींना समुपदेशन करण्यात आले. आणि होऊ घातलेल्या परीक्षेसंबंधी कुठल्याही प्रकारचा ताण न घेता आपले मानसिक स्वास्थ्य आणि शारीरिक स्वास्थ्य नीट राखुन चांगला अभ्यास करून परीक्षा द्यावी असे त्यांच्या समुपदेशनामध्ये सांगितले.

Sardar V.P. Arts & Science College AINPUR Pin 425507 Dist. Jalgaon

Principal
Sardar V. P. Arts & Science College
Ainpur, Tal. Raver. Dist- Jalgaon